# उल्हासनगर महानगरपालिका

## ULHASNAGAR MUNICIPAL CORPORATION

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

सामान्य प्रशासन विभाग, दुसरा मजला, मुख्य प्रशासकीय इमारत, चोपडा कोर्ट रोड, उल्हासनगर-४२१००३

दुरध्वनी क्र.- ०२५१- २७२०११६ विस्तार क्र- २०८ फॅक्स- ०२५१-२७२०१०४


जा.क्र.उमपा/साप्रवि/आस्था/मुली/ ६१६/ २२ दिनांक: २२/०७/२०२२

## जाहीरात

उल्हासनगर महानगरपालिका सामान्य प्रशासन विभाग अंतर्गत सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांच्या सेवा एमपॅनेलमेंट पध्दतीने विवाक्षित कामासाठी घेणेबाबत सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी खालील नमुद केल्याप्रमाणे शासकीय/ निमशासकीय कार्यालय/ उल्हासनगर महानगरपालिका कडील तसेच नगरपरिषद/नगरपालिका/महापालिकेच्या शासकीय / निमशासकीय / सिडको /म्हाडा /नगर परिषद / न.पा./ म.न.पा. मध्ये किमान १० वर्षे काम केल्याचा अनुभव, प्रकृती उत्तम असावी. सेवेतील सेवानिवृत्त अधिकारी/ कर्मचा-यांनी, एमपॅनेलमेंट (Empanelment) करण्याकरीता खालील अटी व शर्ती नुसार सेवा प्राप्त करुन घेण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहे. सेवानिवृत्त अभियंता (स्थापत्य), सेवानिवृत्त अभियंता (विद्युत) तसेच सेवानिवृत्त अभियंता (मॅकॅनिक) या पदासाठी दिनांक २५ /०७ /२०२२ ते २९/०७/२०२२ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत खालील पदांसाठी इच्छुक व पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहे.

सदर जाहिरात उल्हासनगर महानगरपालिका नोटीसबोर्ड आणि www.umc.gov या संकेत स्थळावर उपलब्ध असून, सदरहू भरती प्रक्रीये संदर्भात अधिक माहिती संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

| अ.क्र. | पदनाम | विवक्षित कामाचा तपशिल | शैक्षणिक अर्हता | मानधन |
|---|---|---|---|---|
| १ | सेवानिवृत्त अभियंता (स्थापत्य) | सार्वजनिक बांधकाम विभाग /प्रभाग समिती कार्यालय/नगररचना विभाग/पाणी पुरवठा विभाग/विदयुत विभाग तसेच मालमत्ता विभागातील विवक्षीत कामे | अ) मान्यता प्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रिकी शाखेची पदविका<br>ब) शासकीय/निमशासकीय /सिडको/म्हाडा/नगरपरिषद/ नगरपालिका/ महानगरपालिका मध्ये किमान १० वर्षाचा काम केल्याचा अनुभव<br>क) प्रकृती उत्तम असावी. | देय मासिक परिश्रामिक शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक १७/१२/२०१६ मधील शासन निर्णयातील ड(१) (क) च्या अनुषंगाने देण्यात येईल. |
| २ | सेवानिवृत्त अभियंता (विद्युत) | | | |
| ३ | सेवानिवृत्त अभियंता (मॅकॅनिक) | | | |

अटी व शर्ती :-

१. अर्ज स्विकारण्याचे ठिकाण :- सामान्य प्रशासन विभाग, दुसरा मजला, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर-३ येथे अर्ज स्विकारले जातील. तसेच अर्जाचा नमूना संकेतस्थळावर व सामान्य प्रशासन विभाग येथे उपलब्ध होतील (दिनांक २५ /०७ /२०२२ ते २२ /०७ /२०२२ सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत.)

२. करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितांस शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे / सामावून घेण्याचे वा नियमित सेवेच इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार / हक्क नसेल.

३. नियुक्तीसाठी सक्षम असलेल्या प्राधिकरणाने विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा कर्मचा-याच्या करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राखून ठेवले आहेत.

४. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीस, सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेला नसावी.

५. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीने गुंतलेले हितसंबंध (conflict of interest) जाहीर करणे आवश्यक राहील.

६. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीस प्राप्त होणा-या अधिकारा अंतर्गत येणारे आवश्यक दस्तऐवज/ कागदपत्रे/ माहिती व आधार सामुग्री याबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.

७. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीने त्यांच्यावर सोपविलेले कामकाज, निश्चित केलेल्या विहीत कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत सक्षम असलेले प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेऊन कामाचे मूल्यमापन करतील.

८. सदरची सेवा फक्त ३ वर्षाच्या मर्यादेकरिताच राहणार आहे. तथापि १ वर्षाच्या कालावधीत त्यांचे कामाचे मूल्यमापन करुन पुढे सदरची सेवा सुरु ठेवणे किंवा नाही, याबाबत महानगरपालिकेचा निर्णय अंतिम राहील.

९. करार पध्दतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारी यांच्याविरूध्द कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी.

१०. सदरच्या मुलाखती वेळी सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांसोबत स्व-घोषणापत्र भरून देणे बंधनकारक राहील.

११. करार पध्दतीने नियक्त करावयाचा सेवानिवृत्त अधिकारी शारीरिक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा, तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्याच्याकडे आवश्यक क्षमता असावी.

१२. उल्हासनगर महानगरपालिकेस आवश्यक तितकेच अधिकारी/कर्मचारी घेण्यात येतील.

१३. करार पध्दतीने नियुक्ती करण्यातआलेल्या व्यक्ती वयाच्या ६५ व्या वर्षापर्यंतच कार्यरत राहू शकतील.

मा. आयुक्त साहेब यांच्या मान्यतेने

उप आयुक्त(मुख्यालय)
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका

## सेवानिवृत्त अभियंता पदासाठी अर्ज

प्रति,
मा. आयुक्त सो
उल्हासनगर महानगरपालिका,
उल्हासनगर – ३

पासपोर्ट आकाराचा फोटो चिटकवून स्वत: साक्षांकीत करावे

१) संपूर्ण नाव : ..........................................................................

२) पत्ता : ..........................................................................
..........................................................................

३) दुरध्वनी क्रमांक व ईमेल : ..........................................................................
..........................................................................

४) जन्म दिनांक : / / वय : ..................

५) सेवा निवृत्तीचा दिनांक : ..........................................

६) सेवा निवृत्त झाले तेव्हाचे पदनाम : ..........................................

७) सेवा निवृत्त झाले तेव्हाचे कार्यालय : ..........................................

८) शैक्षणिक अर्हता : ..........................................

९) अर्जासोबत खालील (छायांकित) सत्यप्रती जोडलेल्या आहेत –

१)

२)

३)

४)

५)

वर नमूद केलेली सर्व माहिती खरी असून ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर रदद करण्यात येईल आणि माझे विरुध्द कायदेशीर कारवाई होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण :
दिनांक :

सही..........................................
( )

---

**-: कार्यालयाने करावयाची कार्यवाही :-**

वरील उमेदवाराची उपरोक्त माहिती तपासली असुन सदर पदासाठी .............................. (पात्र / अपात्र) आहे.

पात्र / अपात्र कारण - ..........................................................................

दिनांक : / /२०२२

अधिकारी यांची स्वाक्षरी